# List of Castes & Tribes in Maharashtra

Reservation Quota

| SN | Caste | Reservation % | Details of Caste Categories | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1 | SC | 13% | SC & SC converts to Budhhism अनुसुचीत जाती | 59 Castes |
| 2 | ST | 7% | ST incl those living outside specified areas अनुसुचीत जमाती | 47 Tribes |
| 3 | OBC | 19% | OBC -Other Backward Class : इतर मागास वर्ग | 346 Castes |
| 4 | SBC | 2% | SBC - Special Backward Class : विशेष मागास प्रवर्ग | 7 Castes |
| 5 | VJ | 3% | (Vimukta Jati /Denotified Tribes) भटक्या जमाती - अ | 14 Tribes |
| 6 | NT-B | 2.5% | (Nomadic Tribes - B) भटक्या जमाती - ब | 28+7 Tribes |
| 7 | NT-C | 3.5% | Dhangar - (Nomadic Tribes-C) भटक्या जमाती - क | 1 Caste |
| 8 | NT-D | 2% | Vanjari - (Nomadic Tribes-D) भटक्या जमाती - ड | 1 Caste |
| | TOTAL | 52% | | |

TOP

Link of the list of Castes & Tribes in Maharashtra: http://www.ymnonline.com/data/stureg/caste.html

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

## सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८

# महाराष्ट्र राज्य लोकसेवा [ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण ] अधिनियम, २००१

( दिनांक १५ जुलै, २००८ पर्यंत सुधारित )

## MAHARASHTRA ACT No. VIII OF 2004

# The Maharashtra State Public Services [ Reservation for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (Vimukta Jatis), Nomadic Tribes, Special Backward Category and Other Backward Classes ] Act, 2001

*(As modified upto the 15th July, 2008)*

*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००९

[किंमत : रुपये ५.०० ]

# महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१

## (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८)

## अनुक्रमणिका


**उद्देशिका**

**कलमे**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. प्रयोज्यता.

४. आरक्षण व टक्केवारी.

५. पदोन्नतीमधील आरक्षण.

६. राखीव असलेल्या रिक्त जागा पुढे नेणे.

७. अधिनियमाचे अनुपालन करण्याची जबाबदारी व अधिकार.

८. शास्ती.

९. अभिलेख मागविण्याचे अधिकार.

१०. निवड समितीमधील प्रतिनिधित्व.

११. अनियमित नियुक्त्या निरर्थक असणे.

१२. सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीला संरक्षण.

१३. नियम करण्याचा अधिकार.

१४. या अधिनियमाच्या तरतुदी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याच्या तरतुदींच्या व्यतिरिक्त असणे.

१५. व्यावृत्ती.

१६. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

## सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

## महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २२ जानेवारी, २००४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तींसाठी लोकसेवांमधील व पदांमधील रिक्त जागांच्या आरक्षणाकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तींसाठी लोकसेवांमधील व पदांमधील रिक्त जागांच्या आरक्षणकरिता आणि त्याच्याशी संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

**व्याख्या.**

२. या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " नियुक्ती प्राधिकरण " याचा लोकसेवा व पदे यांच्या संबंधातील अर्थ, अशा सेवांमध्ये किंवा पदांवर नियुक्ती करण्यासाठी अधिकार प्रदान केलेले प्राधिकरण, असा आहे ;

(ख) " निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) " याचा अर्थ, शासनाने, वेळोवेळी विमुक्त जाती म्हणून घोषित केलेल्या जमाती, असा आहे ;

(ग) " आस्थापना " याचा अर्थ, शासनाचे किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही अधिनियमान्वये घटित केलेल्या स्थानिक प्राधिकरणाचे किंवा सांविधिक प्राधिकरणाचे कोणतेही कार्यालय, किंवा विद्यापीठ किंवा जिच्यातील भाग भांडवल शासनाने धारण केले आहे अशी एखादी कंपनी, महामंडळ किंवा सहकारी संस्था किंवा कोणतीही शासकीय अर्थसहाय्यित संस्था, असा आहे ;

**स्पष्टीकरण.**— या खंडाच्या प्रयोजनार्थ, " शासकीय अर्थसहाय्यित संस्था " या शब्दप्रयोगात, ज्या संस्थांना किंवा उद्योगांना हा अधिनियम लागू होण्याच्या पूर्वी अथवा त्यानंतर, शासनाकडून

सवलतीच्या दराने शासकीय जमिनीच्या स्वरूपात किंवा इतर कोणत्याही आर्थिक सवलतींच्या स्वरूपात सहाय्य देण्यात आलेले आहे, किंवा ज्यांना शासनाकडून मान्यता, लायसन देण्यात आले आहे, ज्यांच्यावर शासनाकडून देखरेख किंवा नियंत्रण ठेवण्यात येते, अशा संस्थांचा किंवा उद्योगांचाही अंतर्भाव होतो ;

(घ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ङ) " गट ' अ ', ' ब ', ' क ' आणि ' ड ' " याचा अर्थ, शासनाने, याबाबत वेळोवेळी दिलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे वर्गीकरण केल्याप्रमाणे गट ' अ ', ' ब ', ' क ' किंवा यथास्थिति, ' ड ' च्या कक्षेत येणारी पदे, असा आहे ;

(च) " भटक्या जमाती " याचा अर्थ, शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या, आपल्या उपजीविकेच्या शोधात जागोजागी भटकणाऱ्या जमाती, असा आहे ;

(छ) " इतर मागासवर्ग " याचा अर्थ, शासनाने घोषित केलेला, सामाजिकदृष्ट्या आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या नागरिकांचा कोणताही वर्ग, असा आहे आणि त्यात भारत सरकारने महाराष्ट्र राज्याच्या संबंधात इतर मागासवर्ग म्हणून घोषित केलेल्या नागरिकांचा समावेश होतो ;

(ज) " विहित " याचा अर्थ, शासनाने या अधिनियमान्वये तयार केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(झ) " लोकसेवा व पदे " याचा अर्थ, राज्याच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या सेवा व पदे, असा आहे आणि त्यामध्ये,—

(एक) स्थानिक प्राधिकरण ;

(दोन) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये स्थापन केलेली व जिच्यात राज्य शासन भागधारक आहे अशी सहकारी संस्था ; १९६१ चा महा. २४.

(तीन) शासनाच्या मालकीचे व शासनाने नियंत्रित केलेले, केंद्रीय किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये स्थापन केलेले मंडळ किंवा महामंडळ किंवा सांविधिक संस्था किंवा कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम ६१७ मध्ये व्याख्या केलेली शासकीय कंपनी ; १९५६ चा १.

(चार) महाराष्ट्र अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये स्थापन केलेल्या विद्यापीठासह, शासनाचे सहायक अनुदान घेणारी, शासनाच्या मालकीची व शासनाने नियंत्रित केलेली शैक्षणिक संस्था ;

(पाच) कोणतीही आस्थापना ; आणि

(सहा) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, शासकीय आदेशाद्वारे ज्यांच्या बाबतीत आरक्षण लागू करण्यात आले होते आणि ज्यांचा उपखंड (एक) ते (पाच) मध्ये समावेश करण्यात आलेला नाही अशा यंत्रणा,—

यांमधील सेवांचा व पदांचा समावेश होतो ;

(ञ) " सेवाभरती वर्ष " याचा अर्थ, ज्या इंग्रजी कॅलेंडर वर्षात प्रत्यक्षात सेवाभरती केली ते वर्ष, असा आहे ;

(ट) " आरक्षण " याचा अर्थ, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्या सदस्यांसाठी सेवांमध्ये पदांचे आरक्षण, असा आहे ;

(ठ) " अनुसूचित जाती " व " अनुसूचित जमाती " यांना, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३६६ याच्या खंड (२४) आणि (२५) मध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आलेले असतील तेच अर्थ असतील ;

(ड) " विशेष मागास प्रवर्ग " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाने विशेष मागास प्रवर्ग म्हणून घोषित केलेला, सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या नागरिकांचा वर्ग, असा आहे.

**प्रयोज्यता.**

३. (१) हा अधिनियम,—

(क) वैद्यकीय, तंत्र व शिक्षण क्षेत्रातील अति विशेषीकृत पदे ;

(ख) बदली किंवा प्रतिनियुक्तीद्वारे भरावयाची पदे ;

(ग) पंचेचाळीस दिवसांपेक्षा कमी कालावधीसाठीच्या तात्पुरत्या नियुक्त्या ; आणि

(घ) कोणत्याही संवर्गातील किंवा श्रेणीतील एकल (एकाकी) पदे,

यांव्यतिरिक्त, लोकसेवांमधील व पदांवरील सर्व नियुक्त्यांना लागू होईल.

(२) कलम २ मधील खंड (ग) च्या स्पष्टीकरणामध्ये तरतूद केल्याप्रमाणे, कोणतेही सहाय्य देण्यासंबंधात कोणत्याही आस्थापनेशी करार करताना किंवा अशा कराराचे नूतनीकरण करताना, राज्य शासन, अशा आस्थापनेने या अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करावे अशी अट त्या करारात समाविष्ट करील.

**आरक्षण व टक्केवारी.**

४. (१) या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये अन्यथा तरतूद केली नसेल तर, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांसाठी राखून ठेवलेली पदे, अशा जातीतील, जमातीतील, प्रवर्गातील किंवा वर्गातील नसलेल्या उमेदवारांद्वारे भरण्यात येणार नाहीत.

(२) या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, कलम २ च्या खंड (ञ) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या लोकसेवांच्या आणि पदांच्या थेट सेवा भरतीच्या वेळी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांतील व्यक्तींसाठी खाली तरतूद केल्याप्रमाणे पदे राखून ठेवण्यात येतील :—

| जाती/जमाती/प्रवर्ग/ वर्ग यांचे वर्णन | | राखून ठेवावयाच्या रिक्त जागांची किंवा पदांची टक्केवारी |
|---|---|---|
| (१) अनुसूचित जाती | . . | १३ टक्के ; |
| (२) अनुसूचित जमाती | . . | ७ टक्के ; |
| (३) निरधिसूचित जमाती (अ) | . . | ३ टक्के ; |
| (४) भटक्या जमाती (ब) | . . | २.५ टक्के ; |
| (५) भटक्या जमाती (क) | . . | ३.५ टक्के ; |
| (६) भटक्या जमाती (ड) | . . | २ टक्के ; |
| (७) विशेष मागास प्रवर्ग | . . | २ टक्के ; |
| (८) इतर मागासवर्ग | . . | १९ टक्के ; |
| एकूण | . . | ५२ टक्के : |

परंतु, शासनास, **राजपत्रातील** आदेशाद्वारे, अशी तरतूद करता येईल की, सर्व पदांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्याकरिता ठेवावयाच्या आरक्षणाची टक्केवारी ही,—

(एक) राज्य संवर्गातील पदांच्या बाबतीत, राज्याच्या नवीनतम जनगणना अभिलेखाच्या आधारे, आणि

(दोन) जिल्हा संवर्गातील पदांच्या बाबतीत, संबंधित जिल्ह्याच्या नवीनतम जनगणना अभिलेखाच्या आधारे,—

काढण्यात येईल :

परंतु आणखी असे की, " उन्नत व प्रगत गटाचे " तत्त्व, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त, वर नमूद केलेल्या सर्व प्रवर्गांना लागू असेल.

**स्पष्टीकरण एक.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, " निरधिसूचित जमाती (**अ**) ", " भटक्या जमाती (**ब**) ", " भटक्या जमाती (**क**) "आणि " भटक्या जमाती (**ड**) " या शब्दप्रयोगांचा अर्थ, शासनाने, याबाबत वेळोवेळी काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे " निरधिसूचित जमाती (**अ**) ", " भटक्या जमाती (**ब**) ", " भटक्या जमाती (**क**) " आणि " भटक्या जमाती (**ड**) " म्हणून घोषित केलेल्या अशा जमाती किंवा पोट-जमाती, असा आहे.

**स्पष्टीकरण दोन.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, " उन्नत व प्रगत गट " या शब्दप्रयोगाचा अर्थ, शासनाच्या सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाने याबाबत वेळोवेळी काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे घोषित केल्याप्रमाणे " उन्नत व प्रगत " प्रवर्गात मोडणाऱ्या व्यक्ती, असा आहे :

परंतु असेही की, हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास, ठाणे, नाशिक, धुळे, नंदूरबार, रायगड, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यांमधील अनुसूचित जमातीकरिता कोणत्याही शासकीय आदेशान्वये **क** आणि **ड** गटांतील पदांच्या थेट सेवा भरतीसाठी कोणतेही अतिरिक्त आरक्षण अंमलात असल्यास, असे आरक्षण अशा आदेशांमध्ये फेरफार करण्यात येईपर्यंत किंवा ते रद्द करण्यात येईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.

(३) पोट-कलम (२) खालील तक्त्यातील अनुक्रमांक (३) ते (६) (दोन्ही धरून) मध्ये नमूद केलेल्या प्रवर्गांसाठी विनिर्दिष्ट केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय असेल. उक्त कोणत्याही प्रवर्गासाठी राखून ठेवलेल्या पदांकरिता योग्य उमेदवार त्याच सेवाभरती वर्षात उपलब्ध न झाल्यास, अशी पदे, इतर कोणत्याही उक्त प्रवर्गातील योग्य उमेदवारांना नियुक्त करून भरण्यात येतील.

(४) विभागीय स्तरावरील किंवा जिल्हा स्तरावरील सर्व पदांमध्ये, शासनाने त्याबाबतीत अधिसूचित केले असेल त्याप्रमाणे, अशा गट-**क** आणि गट-**ड** च्या प्रवर्गांमध्ये सेवाभरती वर्षात आढळून येणारी आरक्षणाची टक्केवारी ही, अशा विभागीय किंवा जिल्हा स्तरावरच फक्त राखली जाईल.

**पदोन्नतीमधील आरक्षण.** ५. (१) पदोन्नतीतील आरक्षण हे, पदोन्नत्यांच्या सर्व टप्प्यांवर असेल.

(२) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास, पदोन्नतीद्वारे भरावयाच्या कोणत्याही पदांसाठी आरक्षणाची तरतूद करणारे शासनाचे आदेश अंमलात असल्यास, शासनाकडून त्यांमध्ये फेरफार करण्यात आला नसेल किंवा ते आदेश रद्द करण्यात आले नसतील तर ते, अंमलात असण्याचे चालू राहतील.

६. (१) कोणत्याही सेवाभरती वर्षाच्या संबंधात कलम ४ च्या पोट-कलम (२) अन्वये, व्यक्तींच्या कोणत्याही प्रवर्गासाठी राखीव असलेली कोणतीही रिक्त जागा भरली गेली नाही तर, अशी रिक्त जागा, सरळ सेवाभरतीच्या बाबतीत पाच वर्षांपर्यंत आणि पदोन्नतीच्या बाबतीत तीन वर्षांपर्यंत पुढे नेण्यात येईल : राखीव असलेल्या रिक्त जागा पुढे नेणे.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, मागासवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे अशी पदे भरण्यासंबंधीचे कोणतेही शासकीय आदेश अंमलात असल्यास, असे शासकीय आदेश, त्यांमध्ये शासनाकडून फेरफार करण्यात आला नसेल किंवा ते आदेश रद्द करण्यात आले नसतील तर, अंमलात असण्याचे चालू राहतील.

(२) पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे एखादी रिक्त जागा पुढे नेण्यात आली असेल तेव्हा, ज्या सेवाभरती वर्षामध्ये ती पुढे नेण्यात आली असेल त्या सेवाभरती वर्षाकरिता व्यक्तींच्या संबंधित प्रवर्गासाठी राखीव असलेल्या रिक्त जागांच्या नियतवाटपामध्ये ती हिशेबात धरली जाणार नाही :

परंतु, नियुक्ती प्राधिकारी, अशा न भरलेल्या रिक्त जागा भरण्यासाठी कोणत्याही वेळी विशेष सेवाभरती मोहीम हाती घेईल आणि जर अशा विशेष सेवाभरती मोहिमेनंतरही अशा रिक्त जागा भरल्या गेल्या नाहीत तर, त्यानंतर, शासन विहित करील अशा रीतीने त्या जागा भरण्यात येतील.

७. (१) शासनास, लेखी आदेशाद्वारे, प्रत्येक नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे किंवा त्या प्राधिकाऱ्याच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्याकडे या अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन होत असल्याची सुनिश्चिती करण्याची जबाबदारी सोपविता येईल. अधिनियमाचे अनुपालन करण्याची जबाबदारी व अधिकार.

(२) शासनास, त्याच रीतीने पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे किंवा त्या अधिकाऱ्याकडे, पोट-कलम (१) अन्वये सोपविलेले कर्तव्य परिणामक रीतीने पार पाडण्यासाठी अशा प्राधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास आवश्यक असतील असे अधिकार किंवा प्राधिकार विनिहित करता येतील.

८. (१) कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये, कर्तव्य किंवा जबाबदारी सोपविलेला कोणताही नियुक्ती प्राधिकारी किंवा अधिकारी किंवा कर्मचारी, या अधिनियमातील प्रयोजनांचे उल्लंघन होईल किंवा ते निष्फळ ठरतील अशा उद्देशाने हेतुपुरस्सर कृती करील तर, त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर, नव्वद दिवसांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील. शास्ती.

(२) शासनाच्या किंवा शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीखेरीज, कोणतेही न्यायालय या कलमाखालील शिक्षापात्र अपराधांची दखल घेणार नाही.

९. कलम ४ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गांपैकी कोणत्याही प्रवर्गाच्या कोणत्याही व्यक्तीवर, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे किंवा याबाबतीत दिलेल्या शासकीय आदेशांचे कोणत्याही नियुक्ती प्राधिकाऱ्याने पालन न केल्यामुळे प्रतिकूल परिणाम झाला आहे असे शासनाच्या निदर्शनास आल्यास, किंवा निदर्शनास आणल्यास, शासन, योग्य वाटतील अशा अभिलेखांची मागणी करू शकेल आणि तसे आदेश देऊ शकेल. अभिलेख मागवण्याचे अधिकार.

निवड समितीमधील प्रतिनिधित्व.

**१०.** (१) शासनास, आदेशान्वये, लोकसेवांमध्ये व पदांवर नियुक्ती करण्यासाठी किंवा यथास्थिति, पदोन्नती देण्यासाठी व्यक्तींची निवड करण्याच्या प्रयोजनार्थ, निवड, चाळणी आणि विभागीय पदोन्नती समितीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग यांमधील अधिकाऱ्यांना नामनिर्देशित करण्याची तरतूद करता येईल.

(२) शासनास, आदेशाद्वारे, कलम ४ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गातील व्यक्तींच्या हितासाठी, त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, कोणतीही स्पर्धात्मक परीक्षा किंवा तशाच प्रकारच्या अन्य परीक्षा किंवा मुलाखती यांच्या संबंधातील फींमध्ये सवलत देता येईल आणि उच्च वयोमर्यादा शिथिल करता येईल.

(३) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, कोणतीही स्पर्धात्मक परीक्षा किंवा तशाच प्रकारच्या अन्य परीक्षा किंवा मुलाखत यांच्या फींमध्ये सवलत देणे आणि उच्च वयोमर्यादा शिथिल करणे यांसह सवलती आणि शिथिलीकरण यांच्या संबंधात, अंमलात असलेले शासकीय आदेश त्यांमध्ये शासनाने फेरफार केला नसल्यास किंवा ते रद्द केले नसल्यास लागू असण्याचे चालू राहतील.

अनियमित नियुक्त्या निरर्थक असणे.

**११.** या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून केलेल्या कोणत्याही नियुक्त्या निरर्थक होतील.

सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृतीला संरक्षण.

**१२.** या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या अशा कोणत्याही गोष्टीबद्दल, कोणताही प्राधिकारी किंवा व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

**१३.** (१) राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनांत मिळून, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, असा निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति, तो अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**या अधिनियमाच्या तरतुदी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याच्या तरतुदींच्या व्यतिरिक्त असणे.**

**१४.** या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या इतर कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदींच्या व्यतिरिक्त असतील आणि त्यांना न्यूनता आणणाऱ्या नसतील.

**व्यावृत्ती.**

**१५.** या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीच निवड प्रक्रिया सुरू झाली असेल अशा प्रकरणांना या अधिनियमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत आणि अशी प्रकरणे, अशा प्रारंभापूर्वी जे शासकीय आदेश लागू होते आणि ज्या कायद्याच्या तरतुदी लागू होत्या त्यांना अनुसरून हाताळण्यात येतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, प्रस्तुत सेवा नियमांन्वये जेथे—

(एक) फक्त लेखी परीक्षेच्या किंवा मुलाखतीच्या आधारे सेवाभरती करावयाची असेल आणि अशी लेखी परीक्षा किंवा यथास्थिति, मुलाखत सुरू झाली असेल, किंवा

(दोन) लेखी परीक्षा व मुलाखत दोन्हींच्या आधारे सेवा भरती करावयाची असेल आणि अशी लेखी परीक्षा सुरू झाली असेल,

त्याबाबतीत, निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, असे मानण्यात येईल.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

**१६.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर, शासनास, प्रसंगानुरूप, ती अडचण दूर करण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट असेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

Vasantrao Naik Government Institute of Arts and Social Sciences, Nagpur

CLASS- B.A. first YEAR FORM B SESSION 2021-2022

TOTAL BOYS - 181 GIRLS - 213 BOYS+GIRLS = 394

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| OPEN | BOYS | 22 | GIRLS | 32 | TOTAL - | 54 |
| SC | BOYS | 37 | GIRLS | 63 | TOTAL - | 100 |
| ST | BOYS | 44 | GIRLS | 37 | TOTAL - | 81 |
| NT | BOYS | 12 | GIRLS | 07 | TOTAL - | 19 |
| SBC | BOYS | 03 | GIRLS | 10 | TOTAL - | 13 |
| OBC | BOYS | 59 | GIRLS | 64 | TOTAL - | 123 |
| VJ | BOYS | 04 | GIRLS | 00 | TOTAL - | 04 |
| EXS | BOYS | 00 | GIRLS | 00 | TOTAL - | 00 |
| PH | BOYS | 00 | GIRLS | 00 | TOTAL - | 00 |

certified that we have admitted the student as per the intake approved by nagpur university & other statutory authorities

lote- The college is solely responsible for giving admissins more than intake capacity which is sanction by nagpur univarsity & other statutory authorities.

signature of principal

**Form F**

**College Code- 002**

सत्र २०२१—२०२२ या शैक्षणिक सत्रातील विद्यार्थ्यांची तपशिलवार माहिती

१) महाविद्यालयाचे नाव  वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था नागपूर

२) अनुदानित  शासकीय संस्था

३) अभ्यासक्रम पदवी भाग १ २ ३ अभ्यासक्रमाचे प्रवेशित विद्यार्थ्यी

| अ क्र | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेशित विद्यार्थ्यी सख्या | | | अनुसुचित जाती | | अनुसुचित जमाती | | विभक्त भटक्या जमाती | | इतर मागासवर्गीय | | विशेष मागासवर्गीय | | खुले | | अपंग | | अलपसंख्याक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकून | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| १ | बी ए भाग १ | २१३ | १८१ | ३९४ | ३७ | ६३ | ४४ | ३७ | १६ | ०७ | ५९ | ६४ | ०३ | १० | २२ | ३२ | ० | ० | ० | ० |
| २ | बी ए भाग २ | १११ | १७३ | २८४ | ३१ | ४४ | १४ | १६ | ११ | ०९ | २६ | ६२ | ०५ | ०६ | २१ | ४४ | ० | ० | ० | ० |
| ३ | बी ए भाग ३ | ११५ | १७४ | २८९ | २४ | ५८ | २८ | २८ | १४ | १३ | ३५ | ४२ | ०१ | ०१ | १३ | ३२ | ० | ० | ० | ० |
| | | ४३९ | ५२८ | ९६७ | | | | | | | | | | | | | | | | |

XI + XII = 195 | 195

BA - = 967 + 5 | 972

MA - = 843 | 843

2005 | 2010

289

Vasantrao Naik Govt. Institute of Arts & Social Sciences ★ Nagpur ★
एक हृदय एक चित्त

**DIRECTOR**
Vasantrao Naik Govt. Instt.
of Arts and Social Sciences
NAGPUR.

सत्र २०२१–२०२२ या शक्षाणक सत्राताल विद्याथ्याचा तपाशलवार माहिती

**Form F**

**College Code- ००२**

१) महाविद्यालयाचे नाव वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था नागपूर

२) अनुदानित शासकीय संस्था

३) अभ्यासक्रम पदव्युत्तर भाग २ पदविका आणि इतर अभ्यासक्रमाचे प्रवेशित विद्यार्थ्यी

| अ क्र | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेशित विद्यार्थ्यी सख्या | | | | अनुसुचित जाती | | अनुसुचित जमाती | | विभक्त भटक्या जमाती | | इतर मागासवर्गीय | | विशेष मागासवर्गीय | | खुले | | अपंग | | अलपसंख्याक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकून | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| १ | एम ए भाग २ गृहअर्थशास्त्र | २० | ०० | ०५ | ०५ | ०० | ०३ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | एम ए भाग २ उर्दु | ८० | ०० | १५ | १५ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | १४ | ०० | ०० | ०० | ०० |
| ३ | एम ए भाग २अर्थशास्त्र | ८० | १५ | ४८ | ६३ | ०३ | १३ | ०२ | ०८ | ०१ | ०३ | ०५ | १४ | ०१ | ०३ | ०३ | ०७ | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | एम ए भाग २ अरेबिक | ८० | ०२ | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ५ | एम ए भाग २ राज्यशास्त्र | ८० | २१ | ५३ | ७४ | ०९ | ०८ | ०२ | ०३ | ०० | ०६ | ०८ | ३३ | ०२ | ०१ | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०० |
| ६ | एम ए भाग २ तत्वज्ञान | ८० | ०२ | ०५ | ०७ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०० |
| ७ | एम ए भाग २पर्शियन | ८० | ०४ | ०१ | ०५ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०३ | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ८ | एम ए भाग २संगीत | २० | १० | ०९ | १९ | ०२ | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ | ०४ | ०० | ०० | ०५ | ०४ | ०० | ०० | ०० | ०० |
| ९ | एम ए भाग २ मराठी | ८० | १३ | ३१ | ४४ | ०३ | ०५ | ०८ | ०५ | ०० | ०१ | ०२ | १६ | ०० | ०२ | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०० |
| १० | एम ए भाग २ इतिहास | ८० | १६ | ४७ | ६३ | ०५ | ०८ | ०२ | १० | ०१ | ०१ | ०७ | १७ | ०० | ०३ | ०१ | ०८ | ०० | ०० | ०० | ०० |
| ११ | एम ए भाग २भुगोल | २० | ०३ | १३ | १६ | ०० | ०५ | ०२ | ०२ | ०० | ०० | ०० | ०५ | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० |
| १२ | एम ए भाग २इंग्रजी | ८० | १८ | ४६ | ६४ | ०३ | ०४ | ०४ | ०५ | ०० | ०० | ०४ | १२ | ०२ | ०० | ०५ | २५ | ०० | ०० | ०० | ०० |
| १३ | एम ए भाग २संस्कृत | ८० | ०३ | ०६ | ०९ | ०० | ०३ | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ | ०२ | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० |
| | एकून | ८६० | १०७ | २७९ | ३८६ | २५ | ४९ | २० | ३४ | ०४ | १३ | ३२ | १०८ | ०५ | ०९ | २१ | ६६ | ०० | ०० | ०० | ०० |

## सत्र २०२१–२०२२ या शैक्षणिक सत्रातील विद्यार्थ्यांची तपशिलवार माहिती

१) महाविद्यालयाचे नाव वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था नागपूर

**Form F**

**College Code- ००२**

२) अनुदानित शासकीय संस्था

३) अभ्यासक्रम पदव्युत्तर भाग १ पदविका आणि इतर अभ्यासक्रमाचे प्रवेशित विद्यार्थी

| अ क्र | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेशित विद्यार्थी सख्या | | | | अनुसुचित जाती | | अनुसुचित जमाती | | विमुक्त भटक्या जमाती | | इतर मागासवर्गीय | | विशेष मागासवर्गीय | | खुले | | अपंग | | अलपसंख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकून | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मु |
| १ | एम ए भाग १ गुहअर्थशास्त्र | २० | ०० | १७ | १७ | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०२ | ०० | ०९ | ०० | ०२ | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ० |
| २ | एम ए भाग १ ऊर्दु | ८० | ०१ | १७ | १८ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०५ | ०० | ०० | ०१ | १२ | ०० | ०० | ०० | ० |
| ३ | एम ए भाग १अर्थशास्त्र | ८० | ३३ | ४७ | ८० | ०६ | १५ | १५ | ११ | ०० | ०१ | ११ | १६ | ०१ | ०१ | ०० | ०३ | ०० | ०० | ०० | ० |
| ४ | एम ए भाग १ अेरबिक | ८० | ०१ | ०६ | ०७ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०६ | ०० | ०० | ०० | ०० | ० |
| ५ | एम ए भाग १ राज्यशास्त्र | ८० | २३ | ५४ | ७७ | ०४ | १० | ०७ | ११ | ०२ | ०१ | ०९ | २२ | ०० | ०० | ०१ | ०९ | ०० | ०० | ०० | ० |
| ६ | एम ए भाग १ तत्वज्ञान | ८० | ०१ | ०५ | ०६ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०४ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ० |
| ७ | एम ए भाग १पर्शियन | ८० | ०२ | ०४ | ०६ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०२ | ०० | ०० | ०० | ० |
| ८ | एम ए भाग १संगीत | २४ | ०७ | १७ | २४ | ०२ | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०३ | ०३ | ०७ | ०० | ०० | ०१ | ०३ | ०० | ०० | ०० | ० |
| ९ | एम ए भाग १ मराठी | ८० | ०६ | ३५ | ४१ | ०१ | ०९ | ०२ | ०२ | ०१ | ०२ | ०२ | १७ | ०० | ०० | ०० | ०५ | ०० | ०० | ०० | ० |
| १० | एम ए भाग १ इतिहास | ८० | ३५ | ४२ | ७७ | ०५ | ११ | १८ | ०९ | ०१ | ०२ | ०० | ०१ | ०९ | १० | ०२ | ०९ | ०० | ०० | ०० | ० |
| ११ | एम ए भाग १भुगोल | २० | ०८ | १२ | २० | ०४ | ०२ | ०० | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०३ | ०० | ०० | ०३ | ०५ | ०० | ०० | ०० | ० |
| १२ | एम ए भाग १इग्रजी | ८० | १३ | ६४ | ७७ | ०३ | ११ | ०४ | ०५ | ०१ | ०१ | ०४ | २१ | ०० | ०१ | ०१ | २५ | ०० | ०० | ०० | ० |
| १३ | एम ए भाग १संस्कृत | ८० | ०३ | ०४ | ०७ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०३ | ०१ | ०० | ०० | ०० | ० |
| | एकून | ८६४ | १३३ | ३२४ | ४५७ | २५ | ६४ | ४८ | ४१ | ०६ | १४ | ३२ | १०७ | १० | १५ | १९ | ७६ | ०० | ०० | ०० | ० |

MA - भाग - 1 — 457 Total — 843
MA - भाग - 2 - 386